ePaper
जम्मू काश्मीरमध्ये 40 सैनिकांचा कमांडिंग ऑफिसरसह पोलिसांवरच हल्ला

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™


पान 3 वरुन...
पवना नदीत पुन्हा फेसाचा थर; प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 26 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'AI' आणि क्लाउड विस्तारासाठी ४ लाख कोटी गुंतवणार

# 'अॅमेझॉन' ची भारतात ऐतिहासिक गुंतवणूक




महाईन्यूज । नवी दिल्ली

**अॅमेझॉनचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत भारतात २०३० पर्यंत तब्बल ४८ अब्ज डॉलर्स (सुमारे ४ लाख कोटी रुपयांहून अधिक) अतिरिक्त गुंतवणुकीची घोषणा केली. या गुंतवणुकीद्वारे देशातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), क्लाउड सेवा आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात येणार आहे.**

### गुंतवणुकीत १३ अब्ज डॉलर्सची वाढ

अँडी जॅसी यांनी सांगितले की, अॅमेझॉनने २०१० पासून भारतात आतापर्यंत ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. गेल्या वर्षी कंपनीने आणखी ३५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती. मात्र, आता त्यात सुधारणा करत, २०२६ ते २०३० या कालावधीसाठी ही रक्कम आणखी १३ अब्ज डॉलर्सने वाढवून ४८ अब्ज डॉलर्स करण्यात आली आहे.




अँडी जॅसी यांनी सांगितले की, अॅमेझॉनने २०१० पासून भारतात आतापर्यंत ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. यापूर्वी जाहीर केलेल्या ३५ अब्ज डॉलर्सच्या योजनेत आता आणखी १३ अब्ज डॉलर्सची भर घालून २०२६ ते २०३० या कालावधीतील एकूण गुंतवणूक ४८ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना जॅसी यांनी भारत हा जागतिक स्तरावर AI आणि क्लाउड तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र बनत असल्याचे सांगितले. तर, पंतप्रधान मोदी यांनी अॅमेझॉनच्या या विक्रमी गुंतवणुकीचे स्वागत करत यामुळे देशातील तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि भारतावरील जागतिक गुंतवणूकदारांचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

अॅमेझॉनच्या अधिकृत माहितीनुसार, या गुंतवणुकीमुळे २०३० पर्यंत ३८ लाखांहून अधिक रोजगार संधींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठबळ मिळणार आहे. तसेच भारतातून ८० अब्ज डॉलर्सच्या ई-कॉमर्स निर्यातीचे लक्ष्य, १५ लाख लघुउद्योगांना AI तंत्रज्ञानाचा लाभ आणि ४० लाख सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचे उद्दिष्ट कंपनीने निश्चित केले आहे. या गुंतवणुकीमुळे भारताची डिजिटल अर्थव्यवस्था अधिक मजबूत होण्यासह तंत्रज्ञान क्षेत्रातील देशाचे स्थान अधिक बळकट होणार असल्याचे मानले जात आहे.




> “अँडी जॅसी यांच्यासोबतची भेट अत्यंत सकारात्मक राहिली. अॅमेझॉनच्या या विक्रमी गुंतवणुकीचे मी स्वागत करतो. यामुळे आपल्या तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि भारतामधील जागतिक गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास यातून दिसून येतो.”
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### पंतप्रधान मोदींच्या दृष्टीकोनाचे कौतुक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना जॅसी म्हणाले, “गेल्या १२ वर्षांतील पंतप्रधानांचा देशाच्या विकासाचा दृष्टीकोन थक्क करणारा आहे. भारताची प्रगती आणि जागतिक स्तरावर देशाचे वाढते महत्त्व यातून स्पष्टपणे दिसून येते. भारत सध्या जागतिक स्तरावर क्लाउड आणि AI चे एक मोठे केंद्र बनत आहे.”

# आरोपी भीमराव कांबळे दोषी!

## नसरापूर अत्याचार प्रकरणाचा सोमवारी निकाल; आरोपीला फाशीची मागणी

महाईन्यूज । पुणे

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्यचार करुन तिचा खून करणारा आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी दोषी ठरवले. 'हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मिळ' आहे. आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा देण्यात यावी', अशी विनंती विशेष ससकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयाकडे केली. न्यायालयाने सरकार पक्ष, तसेच बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून निकाल राखून ठेवला आहे. येत्या सोमवारी (२९ जून) न्यायालय निकाल जाहीर करणार आहे.**

नसरापूर अत्याचार प्रकरणात सरकार पक्ष आणि बचाव पक्षाने अंतिम युक्तिवाद पूर्ण केला. 'आरोपी कांबळे याने केलेले कृत्य घृणास्पद , क्रुर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा द्यावी', असे विशेष सरकारी वकील मिसर यांनी युक्तीवादात नमूद करुन सर्वोच्च न्यायालायने दिलेल्या १२ महत्त्वपूर्ण निकालाचा संदर्भ दिला. 'महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. कायदे अस्तित्वात असताना अशा प्रकारचे गुन्हे घडतात. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना कायद्याचा धाक बसविण्यासाठी कठोर शिक्षा देण्यात यावी,' असे मिसर यांनी युक्तिवादात सांगितले.

सरकार पक्षाने सादर केलेला डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, सीसीटीव्ही चित्रीकरण, परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष विचारात घेतल्यास आरोपीने गुन्हा केल्याचे सिद्ध झाले, असे न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी स्पष्ट केले. 'या प्रकरणातील पुरावे सबळ आणि ठोस आहेत. आरोपी कांबळेच्या बचावातील मुद्दे ग्राह्य धरता येत नाही, असे मिसर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.



### बचाव पक्षाचा युक्तिवाद

गुन्हा शाबीत करण्यासाठी पोलिसांनी दिलेले पुरावे हे परिस्थितीजन्य आहे. आरोपी हा गुन्हेगार आहे, हे सिद्ध करणारी घटनेची साखळी उलगडण्यात आली नाही. त्याला पुरक पुरावे सादर करण्यात आले नाहीत. हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मिळ नाही, असे बचाव पक्षाचे वकील ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी युक्तिवादात सांगितले.

बचाव पक्षाकडून ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी काम पाहिले. ॲड. मिसर यांना ॲड. प्रथमेश शिंगणे यांनी सहाय केले. पीडित बालिकेच्या कुटुंबीयांच्या वतीने ॲड. राधिका नावंदर-जोशी, ॲड. मनीष पाडेकर यांनी बाजू मांडली.

### आरोपीचा बचाव फेटाळला

आरोपी भीमराव कांबळे याने न्यायालयात बचाव केला. 'घटनेच्या दिवशी घायवळ यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये गेलो होतो. तेथे बालिका आली होती. तिला गाठी शेव खाण्यास दिली. गोठ्याकडे नेत असताना बालिकेचा पाय घसरला. तिच्या डोक्याला मार लागला. ती रडू लागली. तिला खाटेवर झोपवून तेथून गेलो', असा बचाव कांबळे याने न्यायालयात केला होता. वैद्यकीय पुरावे, घटनास्थळावरील पुरावे, साक्षीदारांची साक्ष या बाबी विचारात घेऊन न्यायालयाने कांबळे याचा बचाव फेटाळून लावला होता. 'पीडित बालिकेच्या शरीरावर १८ गंभीर जखमा आढळून आल्या होत्या. आरोपीने बालिकेवर अत्याचार करुन तिचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. यापूर्वी त्याने दोन महिलांवर अत्याचर केल्याचे प्रकार नोंद आहेत', असे सरकारी वकील मिसर यांनी युक्तिवादात सांगितले.

### न्यायालयात बंदोबस्त; नागरिकांकडून फाशीची मागणी

महाराष्ट्र दिनी बालिकेवर अत्याचार करुन तिचा खून करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेचे संतप्त पडसाद उमटले होते. या खटल्याचा निर्णय न्यायालयाने राखून ठेवला आहे. गुरुवारी न्यायालयात बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी पीडित बालिकेचे कुटुंबीय, विविध सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी घोषणाबाजी करण्यात आली. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

# सिया-चेतनचा पाय खोलात; 'थर्ड वेव्ह'मधलं फुटेज पोलिसांच्या हाती

महाईन्यूज । पुणे

**केतन अग्रवाल हत्याकांड प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलिसांच्या हाती एक महत्त्वाचं सीसीटीव्ही फुटेज लागलं आहे. या फुटेजनं पोलिसांच्या तपासाला नवी दिशा मिळाली आहे. केतनच्या हत्येच्या १ दिवस आधीचं फुटेज पोलिसांना सापडलं आहे. या व्हिडीओमध्ये आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी पुण्यातील एका कॅफेत जाताना दिसत आहेत. याच ठिकाणी बसून दोघांनी केतनला संपवण्याचा कट रचला.**

पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, चेतन आणि सिया १७ जूनच्या संध्याकाळी पुण्यातील थर्ड वेव्ह कॅफेत गेले होते. दोघे संध्याकाळी ४.३५ लाख कॅफेत शिरले. यानंतर जवळपास तासभर



दोघे कॅफेत होते. यानंतर संध्याकाळी ५.३० वाजता दोघे कॅफेतून बाहेर पडले. या तासाभरात नेमकं काय घडलं, याचा शोध पोलीस घेत आहेत. या तासाभरातच केतनला संपवण्याचा कट शिजला.

चेतन आणि सिया १७ जूनला भेटले होते. कॅफेत तासभर झालेल्या भेटीत त्यांनी केतनचा काटा काढण्याची योजना आखली. पोलिसांच्या हाती डिजिटल पुरावे लागले आहेत. या प्रकरणाच्या तपासात आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सिया गोयलनं केतनला संपवण्याआधी यूट्यूबवर जाऊन लोहगडाचे काही व्हिडीओ पाहिले होते. तिच्या सर्च हिस्ट्रीमधून याचा उलगडा झाला आहे. तिनं या लोकेशनबद्दलची माहिती चेतन चौधरी सोबत शेअर केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. ही माहिती कटाचा भाग असल्याचा संशय पोलिसांना आहे.

पोलिसांचा तपास आता केवळ सीसीटीव्ही फुटेजपर्यंत मर्यादित राहिलेला नाही. मोबाईल फोन, चॅट रेकॉर्ड, इंटरनेट सर्च हिस्ट्री आणि दोन्ही आरोपींमध्ये झालेला संवाद यांची माहिती पोलिसांकडून मिळवली जात आहे. या प्रकरणात डिजिटल ट्रेलची भूमिका महत्त्वाची असेल, असं पोलीस अधिकाऱ्यांना वाटतं.

१९ जूनला सियाचा वाढदिवस होता. तोच साजरा करण्यासाठी सिया आणि केतन एक दिवस आधी म्हणजेच १८ जूनला लोहगडावर गेले होते. सियाच्या वाढदिवसासाठी केतननं जय्यत तयारी केली होती. महाबळेश्वरमध्ये एका लक्झरी रिसॉर्टमध्ये ४० ते ५० खोल्या बुक करण्यात आल्या होत्या. एकीकडे केतन सियाच्या वाढदिवसाची तयारी करत असताना दुसरीकडे सिया चेतनच्या साथीनं केतनला संपवण्याचा कट रचत होती.

# पवना नदीत पुन्हा फेसाचा थर; प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## थेरगावातील केजूदेवी बंधाऱ्याजवळ धक्कादायक चित्र; नागरिकांकडून संताप

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना नदीतील प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. बुधवारी (दि. २४) सकाळी थेरगाव येथील केजूदेवी बंधारा परिसरात नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या रंगाचा फेस साचल्याचे धक्कादायक चित्र समोर आले. नदीच्या पृष्ठभागावर पसरलेला फेस आणि परिसरात जाणवणारी दुर्गंधी यामुळे स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.**



> केजूदेवी बंधाऱ्याच्या वरील भागात रावेत बंधारा आहे. तिथून पिण्याचे पाणी उचलले जाते. दोन्ही बंधाऱ्याच्या मधल्या भागात पावसामुळे पाण्याची पातळी वाढते. त्यामुळे नदीपात्रावरील सर्व गाळ ढवळल्यामुळे पाण्याला फेस येतो आणि बंधाऱ्यातील पाणी फेसाळते.
>
> **- मंचक जाधव (उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पिं.चि)**

### लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा स्रोत

पवना नदी ही पिंपरी-चिंचवड शहरातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. त्यामुळे नदीतील वाढते प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा विषय नसून नागरिकांच्या आरोग्याशी आणि जलसुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न बनला आहे. महापालिकेचा पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. नदी संवर्धनासाठी विविध योजना राबविल्या जात असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात नदीची स्थिती दिवसेंदिवस खालावत असल्याचे वास्तव समोर येत आहे.

एकेकाळी स्वच्छ आणि प्रवाही असलेली पवना नदी आज गंभीर प्रदूषणाचा सामना करत असल्याचे चित्र आहे. नदीत संशयित रासायनिक सांडपाणी तसेच अशुद्ध पाणी मिसळले जात असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी सातत्याने करत आहेत. त्यामुळे नदीचे नैसर्गिक स्वरूप बदलत असून जलचरांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. नदीची पर्यावरणीय क्षमता दिवसेंदिवस कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

बुधवारी सकाळी नदीच्या अनेक भागांत पाण्यावर जाड पांढरा फेस दिसून आला. काही ठिकाणी पाण्याचा रंगही बदलल्याचे नागरिकांनी सांगितले. पावसाळ्याच्या तोंडावर नदीची अशी अवस्था अत्यंत चिंताजनक असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते, पवना नदीतील प्रदूषणाच्या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. वारंवार अशा घटना घडत असतानाही प्रदूषणाचे मूळ कारण शोधण्यात आणि दोषींवर प्रभावी कारवाई करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप केला जात आहे.

# महापालिकेचा कारभार भिजला; विद्यार्थ्यांना रेनकोटच नाही!



**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळा सुरू होऊन नऊ दिवस उलटले तरी विद्यार्थ्यांना रेनकोट, दप्तर, बूट, सॉक्स आणि अन्य शालेय साहित्याचे वितरण झालेले नाही. पावसाळ्याला सुरुवात झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना पावसात भिजत शाळेत जावे लागत असून, पालकांनी शिक्षण विभागाच्या नियोजनावर नाराजी व्यक्त केली आहे.**

महापालिका शिक्षण विभागाने शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य वितरित केले जाईल, असे जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात शासनाकडून उपलब्ध झालेली पाठ्यपुस्तके आणि गणवेशाचेच वितरण सुरू आहे. शालेय साहित्य खरेदीच्या निविदा प्रक्रियेला विलंब झाल्याने अद्याप संबंधित साहित्याची ऑर्डरही देण्यात आलेली नाही.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ११० प्राथमिक आणि २४ माध्यमिक शाळांमध्ये सुमारे ५५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरवर्षी विद्यार्थ्यांना दप्तर, रेनकोट, बूट, सॉक्स, कंपास, वह्या, व्यवसायमाला, पाण्याची बाटली आणि जेवणाचा डबा मोफत दिला जातो. मात्र, यंदा शाळा सुरू होऊन नऊ दिवस उलटूनही या साहित्याचे वितरण सुरू झालेले नाही.

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळाली असली, तरी ती सुरक्षितपणे शाळेत नेण्यासाठी दप्तर नाही आणि पावसापासून बचावासाठी रेनकोटही उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पुस्तके आणि वह्या सांभाळत पावसात भिजत शाळेत जावे लागत आहे.

यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासह शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, शालेय साहित्याचे तातडीने वितरण करण्याची मागणी पालकांनी केली आहे.

### रेनकोट, दप्तर अन् साहित्याची प्रतीक्षा

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ११० प्राथमिक व २४ माध्यमिक शाळांमधील सुमारे ५५ हजार विद्यार्थ्यांना दरवर्षी रेनकोट, दप्तर, बूट, सॉक्स, वह्या, कंपास, पाण्याची बाटली व जेवणाचा डबा मोफत दिला जातो. यंदा मात्र शाळा सुरू होऊन नऊ दिवस उलटले तरी या साहित्याचे वितरण झालेले नसल्याने विद्यार्थ्यांना पावसात भिजत शाळेत जावे लागत आहे. पालकांनी तातडीने साहित्य वाटप करण्याची मागणी केली आहे.

> महापालिका शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांचे वाटप झाले आहे. सध्या गणवेश वितरण सुरू आहे. शालेय साहित्यासाठी अद्याप ऑर्डर दिलेली नाही. ती दिल्यानंतर तीन ते चार दिवसांत शालेय साहित्याचे वितरण सुरू केले जाईल.
>
> **- संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग**

> शाळा सुरू होऊन नऊ दिवस झाले, तरी महापालिका शाळांमध्ये रेनकोट आणि शालेय साहित्य मिळालेले नाही. यासाठी आठवडाभर वाट पाहणार आहोत. नंतर शिक्षण विभागाच्या कार्यालयात आंदोलन केले जाईल.
>
> **- राजू भालेराव, उपाध्यक्ष, मनसे जनहित कक्ष व विधी विभाग महाराष्ट्र.**

### आंदोलनाचा इशारा

महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट व अन्य शालेय साहित्य आणखी आठवडाभरात वितरित झाले नाही, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे जनहित कक्ष व विधी विभागाचे उपाध्यक्ष राजू भालेराव यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



## भूमिका

# पीओकेच्या जखमेवर पाकिस्तानचाच घाव



**पाकिस्तानने काश्मीर प्रश्नावर गेली जवळपास आठ दशके आंतरराष्ट्रीय स्तरावर आक्रमक भूमिका घेतली आहे. काश्मिरी जनतेच्या हक्कांसाठी आपण संघर्ष करीत आहोत, असा दावा सातत्याने केला गेला. मात्र, पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी अलीकडे केलेल्या एका वक्तव्यामुळे पाकिस्तानच्या या भूमिकेतील मूलभूत विसंगती जगासमोर उघड झाली आहे.**

पाकव्याप्त काश्मीरमधील रहिवासी ‘अस्सल काश्मिरी’ नसून ते ‘पहाडी’ आणि ‘पोटोहारी’ भाषा बोलणारे आहेत, असे त्यांनी म्हटले. या विधानामुळे पाकिस्तानने वर्षानुवर्षे उभा केलेला कथित काश्मीरवादच प्रश्नचिन्हाखाली आला आहे. जर पाकव्याप्त काश्मीरमधील लोक काश्मिरीच नसतील, तर पाकिस्तान नेमका कोणाच्या वतीने काश्मीरचा मुद्दा उपस्थित करीत होता, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे. वास्तविक पाहता, पाकव्याप्त काश्मीर आणि गिल्गिट-बाल्टिस्तान हे सांस्कृतिक व भाषिकदृष्ट्या विविधतेने नटलेले प्रदेश आहेत. तेथील लोकांची स्वतंत्र ओळख आणि परंपरा आहेत.

मात्र, पाकिस्तानने या वास्तवाकडे दुर्लक्ष करून संपूर्ण प्रदेशाला एका राजकीय कथानकात बसविण्याचा प्रयत्न केला. आज त्याच देशाच्या संरक्षणमंत्र्यांनी त्या कथनालाच छेद दिला आहे.दरम्यान, पाकव्याप्त काश्मीरमध्ये वाढत्या महागाई, बेरोजगारी आणि प्रशासनावरील अविश्वासामुळे जनआंदोलने उफाळून आली आहेत. आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये संघर्ष होत असून, अनेक ठिकाणी हिंसक घटनाही घडल्या आहेत.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पाकिस्तानी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. काश्मिरी जनतेच्या हक्कांचा पुरस्कार करण्याचा दावा करणाऱ्या पाकिस्तानला आज त्याच प्रदेशातील नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. हा विरोधाभास पाकिस्तानच्या नैतिक आणि राजकीय दिवाळखोरीचे प्रतीक मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका अधिक ठळकपणे समोर येते. भारताने सातत्याने जम्मू-काश्मीर आणि पाकव्याप्त काश्मीर हा देशाचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. अलीकडील घटनांमुळे पाकिस्तानच्या दाव्यांतील पोकळपणा अधोरेखित झाला असून, भारताला आपली भूमिका अधिक प्रभावीपणे मांडण्याची संधी निर्माण झाली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काही दिवसांपूर्वी केलेले विधानही याच संदर्भात महत्त्वाचे ठरते.

पाकव्याप्त काश्मीरमधील लोक स्वतःहून भारताशी जोडले जाण्याची इच्छा व्यक्त करतील, असे त्यांनी म्हटले होते. तेथील वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर या विधानाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. याचवेळी जम्मू-काश्मीरमधील परिस्थितीकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. कलम ३७० हटविल्यानंतर राज्यात अस्थिरता निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. मात्र, गेल्या काही वर्षांत पर्यटन, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक क्षेत्रात सकारात्मक बदल दिसून आले आहेत. सर्व समस्या संपल्या नसल्या तरी विकास आणि स्थैर्याचा प्रवास सुरू असल्याचे चित्र दिसते. एका बाजूला जम्मू-काश्मीरमध्ये विकासाची प्रक्रिया वेग घेत आहे, तर दुसऱ्या बाजूला पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोष आणि दडपशाहीची चर्चा आहे.

ख्वाजा आसिफ यांच्या वक्तव्याने पाकिस्तानच्या दीर्घकालीन भूमिकेतील विसंगती उघड झाली असून, बदलत्या वास्तवाचे नवे चित्र समोर आले आहे. भावनिक घोषणांपेक्षा वस्तुस्थिती अधिक प्रभावी ठरत असते, हे या घटनाक्रमातून स्पष्ट होते. काश्मीर प्रश्नाच्या भविष्यातील राजकीय आणि नैतिक समीकरणांवर या घडामोडींचा दूरगामी परिणाम होऊ शकतो. भारताने या बदलत्या परिस्थितीचा मुत्सद्दीपणे आणि प्रभावीपणे उपयोग करून घेण्याची गरज आहे.

## प्रासंगिक »

### बाप आणि मुली

**एका गृहस्थाच्या दोन विवाहित मुली होत्या. एकीचे लग्न शेतकऱ्याशी तर दुसरीचे कुंभाराशी झाले होते. एकदा दोघी माहेरी आल्या असता वडिलांनी त्यांच्या संसाराची चौकशी केली.**

शेतकऱ्याची पत्नी असलेली मुलगी म्हणाली, “बाबा, देवाला प्रार्थना करा की यंदा भरपूर पाऊस पडू दे. त्यामुळे आमच्या शेतातील पिके चांगली येतील आणि उत्पन्न वाढेल.” हे ऐकताच कुंभाराची पत्नी असलेली दुसरी मुलगी म्हणाली, “बाबा, तसे करू नका. निदान काही दिवस तरी पाऊस पडू नये, अशी प्रार्थना करा. पाऊस नसल्यास मडकी व्यवस्थित भाजता येतील आणि आम्हाला चांगला नफा मिळेल.”

दोन्ही मुलींच्या परस्परविरोधी इच्छा ऐकून वडील संभ्रमात पडले. शेवटी ते म्हणाले, “मुलींनो, मी तुमच्या दोघींच्याही भावना देवापुढे मांडेन; पण योग्य निर्णय देवावरच सोपवतो.”

- तात्पर्य : **जेव्हा आपल्या जवळच्या व्यक्तींकडून परस्परविरोधी अपेक्षा व्यक्त केल्या जातात, तेव्हा निष्पक्ष राहणे आणि निर्णय परिस्थितीवर सोपवणे अधिक शहाणपणाचे ठरते.**

भारतीय शिक्षणव्यवस्थेने गेल्या काही दशकांत प्रवेश आणि पटनोंदणीच्या बाबतीत लक्षणीय प्रगती केली असली, तरी गुणवत्ता, समन्याय्यता आणि रोजगारक्षमता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अद्याप समाधानकारक उत्तर मिळालेले नाही.

# शिक्षणातील उणिवा अन् विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह



सर्व शिक्षा अभियान, शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यांसारख्या उपक्रमांमुळे शिक्षणाची उपलब्धता वाढली; मात्र शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. शालेय शिक्षणाच्या पातळीवर आजही पाठांतर आणि परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धतीचे वर्चस्व कायम आहे. विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तिचा, सर्जनशीलतेचा आणि उपयोजित ज्ञानाचा विकास करण्याऐवजी गुणांच्या शर्यतीवर भर दिला जातो. परिणामी, अनेक विद्यार्थी शालेय शिक्षण पूर्ण करूनही मूलभूत वाचन, लेखन आणि गणित कौशल्यांमध्ये मागे पडत आहेत. वार्षिक शैक्षणिक स्थिती अहवालानेही शिक्षणातील गुणवत्तेची ही गंभीर समस्या अधोरेखित केली आहे. शाळांमधील अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि वाढती गळती ही परिस्थिती आणखी गंभीर बनवत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने अनुभवाधारित शिक्षण, बहुशाखीय अभ्यासक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन यावर भर दिला आहे.

मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी अद्याप अनेक राज्यांत झालेली नाही. धोरणांची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांतील दरी भरून काढणे ही काळाची गरज आहे.उच्च शिक्षण क्षेत्रातही अनेक आव्हाने कायम आहेत. विद्यापीठांना अपुरा निधी, संशोधनासाठी मर्यादित गुंतवणूक आणि मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली अध्यापक पदे यामुळे शिक्षणाचा दर्जा प्रभावित होत आहे. केंद्रीकृत प्रवेश परीक्षा प्रणालीमुळे विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत असून, कोचिंग उद्योगाला चालना मिळत आहे. ग्रामीण, प्रादेशिक भाषा माध्यमातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसतो. याशिवाय विद्यापीठांची स्वायत्तता आणि शैक्षणिक स्वातंत्र्य याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

गुणवत्तेपेक्षा इतर निकषांवर होणाऱ्या नियुक्त्या, संशोधनातील मर्यादा आणि निर्णय प्रक्रियेतील हस्तक्षेप यामुळे उच्च शिक्षण संस्थांची विश्वासार्हता कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. देशाच्या प्रगतीचा पाया शिक्षणावर उभा असतो. त्यामुळे केवळ पटनोंदणी वाढवून किंवा नवीन धोरणे जाहीर करून समस्या सुटणार नाहीत. शिक्षणावर अधिक सार्वजनिक गुंतवणूक, गुणवत्तापूर्ण शिक्षकांची नियुक्ती, संशोधनाला प्रोत्साहन, परीक्षा पद्धतीत सुधारणा आणि शैक्षणिक स्वायत्ततेचा आदर या उपाययोजना तातडीने राबवाव्या लागतील. अन्यथा शिक्षणव्यवस्थेतील या त्रुटी कायम राहतील आणि देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारलेलेच राहील.

## ।। अभंगवाणी ।।



बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी ।
कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥

विचार करितां वांयां जाय काळ ।
लटिकें तें मूळ फजितीचें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# संजय दिना पाटलांची पत्रकारांना शिवीगाळ

## कोणालाही कोणीही अशा प्रकारची धमकी देणं योग्य नाही; मुख्यमंत्री

**महाईन्यूज । मुंबई**

**उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेमधून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार संजय दिना पाटील यांनी आज (२५ जून) पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केल्याच्या घटनेचा व्हिडीओ देखील व्हायरल होत आहे. संजय दिना पाटलांच्या या वक्तव्यानंतर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असून त्यांच्यावर जोरदार टीका होत आहे.**



खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केल्याच्या प्रकरणावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील प्रतिक्रिया देत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात संजय दिना पाटील यांना दिलगिरी व्यक्त करण्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे, अशी माहिती शिंदे यांनीच माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, या घटनेवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे.

“मी प्रवासात असल्यामुळे मला या प्रकरणाची काही माहिती नाही. त्यामुळे या प्रकरणाची सविस्तर माहिती घेऊनच त्यावर बोलणं योग्य होईल. नेमकं काय घडलं? याची माहिती मी घेतो. मी आताच नागपूरवरून आलो आहे. मात्र, कोणालाही कोणीही अशा प्रकारची धमकी देणं योग्य नाही”, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

“मी आताच खासदार संजय दिना पाटील यांच्याशी बोललो. त्यांनी माझ्याकडे भावना व्यक्त केल्या आहेत की, पत्रकारांबद्दल चुकीचं वक्तव्य करण्याची माझी कोणतीही भावना नव्हती. माझे आणि पत्रकारांचे संबंध चांगले आहेत. पत्रकारांच्या भावना दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, असं मला संजय दिना पाटील यांनी सांगितलं”, असं स्पष्टीकरण देत एकनाथ शिंदे यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे.

“जे (संजय राऊत) दररोज त्यांच्या विरोधात बोलतात, रोज त्यांच्याबाबत अपशब्द बोलतात. तोडून टाका, मारून टाका, तुडवा, अशा पद्धतीने खालच्या दर्जाचे जे शब्द वापरतात, मग तो देखील मीडियाचा अपमान आहे. किती दिवसांपासून काय-काय बोलतात ते आपण पाहिलं. याचाच राग संजय दिना पाटील यांच्या मानामध्ये आहे. मात्र, पत्रकारांच्या बाबतीत संजय दिना पाटील यांच्या मनामध्ये कुठलाही राग नव्हता. पत्रकारांच्या बाबतीत अशा प्रकारचं वक्तव्य कोणत्याही लोकप्रतिनिधीने करू नये. त्यामुळे मी त्यांना सांगितलं की तुमच्याकडून जर पत्रकारांना काही शब्द गेले असतील तर पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करावी”, असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी संजय दिना पाटील यांना दिला आहे.

### नेमकं काय म्हटलं?

“रेकॉर्ड करा आणि सांगा तिकडे, कमिशनरकडे जाऊन तक्रार करा. तुमची इज्जत करतोय, तुम्हाला सहन करतोय, खूप दिवस सहन केलं. मग अजून कशाला गां## घुसताय. अरे कोणत्याही गोष्टीची लिमिट असते. सांगितलं ना सर्व. त्याने काही बोलूदे. तुझ्या आ## ### गेलं, आणि आता माझ्याकडे येऊ नका. माझ्याकडे काही घ्यायला आला तर मारणार. रेकॉर्ड करा आणि सांगा. तुम्ही आता मला विचारायला आलात तर मार खाणार”, अशा भाषेत खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# तुकाराम मुंढेच्या विभागाची भिवंडीत पुन्हा कारवाई; दोघांवर गुन्हा

**महाईन्यूज । भिवंडी**

**भिवंडी येथील माणकोली-दापोडे भागात विनापरवाना सौंदर्यप्रसाधनाच्या वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी काही दिवसांपुर्वी केली असून त्यापाठोपाठ आता पुन्हा भिवंडीतील सरलगाव परिसरातील ॲमेझॉन रिटेल इंडिया प्राव्हेट लिमिटेड कंपनीच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई केली आहे. कालबाह्य आणि मानवी आरोग्यास घातक अन्नपदार्थ नष्ट करण्याऐवजी ते बाजारात विक्रीसाठी पाठविल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून याप्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात ॲमेझॉन कंपनीच्या व्यवस्थापकासह दोनजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**






अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्त पदाचा पदभार स्विकाल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी अन्न भेसळ करणाऱ्यांविरोधात मोहिम उघडली आहे. पानमसाला, गुटखा आणि औषध दुकानांविरोधातही कारवाई करत आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात त्यांची पथके कारवाई करत आहेत. अनेक ठिकाणी पथके धाडी टाकत असून यामुळे भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. या विभागाच्या पथकाने काही दिवसांपुर्वी भिवंडी येथील माणकोली-दापोडे भागात विनापरवाना सौंदर्यप्रसाधनाच्या वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून कारवाई केली होती. त्यापाठोपाठ आता पुन्हा भिवंडीतील ॲमेझॉन कंपनीच्या एका गोदामावर धाड टाकून कारवाई केली असून याप्रकरणी ठाणे येथील अन्न सुरक्षा अधिकारी अरविंद वसंत कांडेलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिवंडी तालुक्यातील सरवली गाव येथील ॲमेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि.च्या वितरण केंद्रात अन्न व औषध प्रशासन विभागाने २४ जून २०२६ रोजी तपासणी केली. या तपासणीत कालबाह्य आणि खराब अन्नपदार्थांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी ते पुन्हा बाजारात विक्रीसाठी वळविण्यात आल्याचे निष्पन्न झाले. आर. के. ट्रेडर्सचे मालक रहमान के. यांनी करारातील अटींचे पालन केले नाही आणि अन्नपदार्थांची विल्हेवाट लावल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर केले. तसेच ॲमेझॉन रिटेल इंडियाचे पश्चिम विभागाचे फॅसिलिटी मॅनेजर सोमशेखर बसवराज कोन्नुर आणि कालबाह्य अन्नपदार्थांच्या विल्हेवाट प्रक्रियेशी संबंधित कर्मचाऱ्यांचा या प्रकारात सहभाग असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली आहे, असे ठाणे येथील अन्न सुरक्षा अधिकारी अरविंद वसंत कांडेलकर यांनी पोलिस तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी नागरिकांची दिशाभूल करून मानवी आरोग्यास धोका निर्माण करणारे अन्नपदार्थ अन्नसाखळीत आणून विक्री केल्याच्या आरोपावरून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८(४), २७४, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील कलम २६(१), २६(२)(आय), २७(१), २७(३)(ई) आणि ३१(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष बोराडे करत आहेत. या संदर्भात कोनगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक नेताराम म्हस्के यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा देत याप्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगितले.

# ‘संविधान हत्या दिन’

## आणीबाणीच्या ५० वर्षांवरून पंतप्रधान नरेंद्र मोदींची काँग्रेसवर टीका

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीच्या ५१ व्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर, हा काळ भारताच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘X’ (ट्विटर) वर पोस्ट करत त्यांनी आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांचे रक्षण करणाऱ्या सर्व नागरिकांना आणि नेत्यांना आदरांजली वाहिली. तसेच, हा दिवस ‘संविधान हत्या दिन’ #SAMVIDHANHATYADIWAS म्हणून अधोरेखित केला आहे.**



पंतप्रधान मोदींनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, १९७५ मध्ये लागू करण्यात आलेली आणीबाणी हा भारताच्या राज्यघटनेवर झालेला थेट आणि क्रूर हल्ला होता. या काळात नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली गेली, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली आणि विरोधी पक्षांचे नेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना विनाकारण तुरुंगात डांबण्यात आले. लोकशाहीचा कणा असणाऱ्या न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमांसारख्या महत्त्वाच्या संस्थांवर या काळात मोठा आघात झाला होता.

पंतप्रधानांनी आणीबाणीच्या काळोखातही लोकशाहीचा दिवा तेवत ठेवणाऱ्या सामान्य नागरिकांच्या धैर्याचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, “या भीषण संकटाच्या काळातही देशातील असंख्य नागरिकांनी अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी शांत बसण्यास नकार दिला आणि संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण केले. हे नागरिक आपल्या लोकशाहीचे खरे रक्षक आहेत.”

पंतप्रधानांनी पुढे नमूद केले की, आपली राज्यघटना ही केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षा, हक्क आणि कर्तव्यांचे प्रतीक आहे. सरकार संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. संविधानाच्या मूळ भावनेनुसार चालत भारत देश न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर पुढे जाईल आणि एक मजबूत राष्ट्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### राजकीय महत्त्व

केंद्र सरकारने काही काळापूर्वीच २५ जून हा दिवस अधिकृतपणे ‘संविधान हत्या दिन’ म्हणून पाळण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतर पंतप्रधानांची ही पोस्ट काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन धोरणांवर थेट निशाणा साधणारी आहे. आजच्याच दिवशी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली होती, ज्याची आठवण करून देत भाजप सातत्याने काँग्रेसला लोकशाही विरोधी पक्ष म्हणून घेरण्याचा प्रयत्न करत असते. पंतप्रधानांच्या या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा आणीबाणीच्या काळावरून चर्चा रंगू लागली आहे.

# भारतात ‘AI’ आणि क्लाउड विस्तारासाठी ४ लाख कोटींची मोठी गुंतवणूक

**महाईन्यूज | अमेरिका**

**ॲमेझॉन कंपनीचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी भारतात ॲमेझॉनतर्फे २०३० पर्यंत तब्बल ४८ अब्ज डॉलर्स सुमारे ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त इतकी मोठी अतिरिक्त गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. या गुंतवणुकीचा मुख्य उद्देश भारतातील ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ (AI) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल पायाभूत सुविधा विस्तार करणे हा आहे.**



अँडी जॅसी यांनी सांगितले की, ॲमेझॉनने २०१० पासून भारतात आतापर्यंत ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. गेल्या वर्षी कंपनीने आणखी ३५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती. मात्र, आता त्यात सुधारणा करत, २०२६ ते २०३० या कालावधीसाठी ही रक्कम आणखी १३ अब्ज डॉलर्सने वाढवून ४८ अब्ज डॉलर्स करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना जॅसी म्हणाले, “गेल्या १२ वर्षांतील पंतप्रधानांचा देशाच्या विकासाचा दृष्टीकोन थक्क करणारा आहे. भारताची प्रगती आणि जागतिक स्तरावर देशाचे वाढते महत्त्व यातून स्पष्टपणे दिसून येते. भारत सध्या जागतिक स्तरावर क्लाउड आणि AI चे एक मोठे केंद्र बनत आहे.”

> “अँडी जॅसी यांच्यासोबतची भेट अत्यंत सकारात्मक राहिली. ॲमेझॉनच्या या विक्रमी गुंतवणुकीचे मी स्वागत करतो. यामुळे आपल्या तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि भारतामधील जागतिक गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास यातून दिसून येतो.” – पंतप्रधान नरेंद्र मोदी (X वरील पोस्ट)

### रोजगार आणि छोट्या उद्योगांना मोठा फायदा

ॲमेझॉनने जारी केलेल्या अधिकृत पत्रकानुसार, ही गुंतवणूक केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादित नसून देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारी ठरेल. कंपनीने २०३० पर्यंत खालील उद्दिष्टे ठेवली आहेत. त्यामध्ये ३८ लाखांहून अधिक नवीन रोजगार संधींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठबळ देणे. भारतामधून ८० अब्ज डॉलर्स किमतीच्या उत्पादनांची सामूहिक ई-कॉमर्स निर्यात करणे. देशातील १५ लाख लहान व्यवसायांना AI तंत्रज्ञानाचा फायदा मिळवून देणे. आणि ४० लाख सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे. ॲमेझॉनच्या या ऐतिहासिक पावलामुळे भारताची डिजिटल अर्थव्यवस्था अधिक मजबूत होणार असून, तंत्रज्ञान क्षेत्रात देशाचा दबदबा आणखी वाढणार आहे.




## ‘मिर्झापूर’ मोठ्या पडद्यावर; टीझर रिलीज

चाहते ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण अखेर आला आहे. ‘मिर्झापूर’चे विश्व पुन्हा एकदा चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. ‘मिर्झापूरः द मूव्ही’चा दमदार टीझर प्रदर्शित करण्यात आला असून, या टीझरने चाहत्यांची उत्सुकता वाढवली आहे. त्यामुळे मिर्जापूर वेबसिरीजला चाहत्यांनी भरभरून दाद दिली होती. तशीच मिर्जापूर द मुव्हीला मिळणार असल्याचे बोलले जात आहे. कालीन भैय्या, गुड्डू आणि मुन्ना भैय्या यांच्यात मिर्जापूरच्या सिंहासनासाठी रक्तरंजित संघर्ष रंगताना दिसणार आहे. यावेळी केवळ सत्ता मिळवण्याची लढाई नाही तर स्वतःचे साम्राज्य उभारण्याचे महायुद्ध असणार आहे. एक्सेल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली हा चित्रपट तयार करण्यात आला आहे.

# समंथाची गुडन्यूज!



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री समंथा रूथ प्रभू हिने आपल्या चाहत्यांना मोठा आनंदाचा धक्का दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर तिच्या प्रेग्नन्सीबाबत अनेक चर्चा सुरू होत्या. तिचे काही व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्यानंतर ती गर्भवती असल्याच्या अफवा पसरल्या होत्या. आता मात्र सामंथाने स्वतः या चर्चांवर शिक्कामोर्तब करत प्रेग्नन्सीची अधिकृत घोषणा केली आहे. समंथाने ही आनंदाची बातमी तिच्या आगामी चित्रपट ‘मा इंटी बंगारम’च्या थँक्स मीट कार्यक्रमात चाहत्यांसोबत आणि माध्यमांसमोर शेअर केली. या कार्यक्रमादरम्यान तिने आपल्या आयुष्यातील या खास टप्प्याबद्दल बोलताना सांगितले की, ती सध्या खूप आनंदी आहे आणि काही काळासाठी मॅटरनिटी ब्रेक घेणार आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत ती चित्रपटसृष्टीपासून थोडी दूर राहणार असल्याचेही तिने स्पष्ट केले. समंथाच्या या घोषणेनंतर सोशल मीडियावर चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे. अनेक चाहत्यांनी तिच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या असून तिच्या आरोग्यासाठी प्रार्थना केल्या आहेत. ट्विटर, इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तिच्या नावाचे ट्रेंडही पाहायला मिळत आहेत. समंथा ही दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. आपल्या अभिनयाच्या जोरावर तिने केवळ दक्षिण भारतातच नव्हे, तर संपूर्ण देशभरात मोठा चाहतावर्ग निर्माण केला आहे. अनेक सुपरहिट चित्रपट आणि वेब सीरिजमधील तिच्या भूमिकांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले आहे. त्यामुळे तिच्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक घडामोड चाहत्यांसाठी उत्सुकतेचा विषय ठरते.



# बारह नंबरमध्ये एहसास चन्ना

अभिनेता, कॉमेडियन आणि फिल्ममेकर वीर दासने स्वत:च्या पुढील दिग्दर्शकीय चित्रपट बारह नंबर’ची घोषणा केली आहे. या चित्रपटात शीबा चड्ढा, अरुणोदय सिंह, एहसास चन्ना आणि अतुल कुलकर्णी यासारखे कलाकार आहेत. हा सायकोलॉजिकल हॉररपट असणार आहे. दासने चालू वर्षाच्या प्रारंभी ‘हॅप्पी पटेल : खतरनाक जासूस’ चित्रपटाद्वारे दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण केले होते. बारह नंबर चित्रपटासाठी वीर दास पुन्हा सहदिग्दर्शक कवि शास्त्रrसोबत पुन्हा काम करणार आहे. या चित्रपटात वीर दास भूमिकाही साकारणार असून त्याच्यासोबत निहारिका लायरा दत्त, श्रिया पिळगावकर, सुहैल नय्यर, पूजा स्वरुप आणि नवीन कौशिकही दिसून येणार आहेत. या प्रोजेक्टमध्ये सामील असलेले सर्व कलाकार अभिनयनिपुण आहेत. प्रेक्षकांना प्रत्येक क्षण खरा वाटला तरच भयपट प्रेक्षकांना पसंत पडतो. या कलाकारांच्या टीमने कहाणीला मोठे स्वरुप मिळवून दिले असल्याचा दावा वीर दासने केला आहे. एहसासने यापूर्वी अनेक वेबसीरिजमध्ये काम करत स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. हा चित्रपट तिच्यासाठी एकप्रकारे मोठी संधी ठरणार आहे.

# वैभवच्या पदार्पणापूर्वी द्रविडचा सल्ला

## वैभव सूर्यवंशी क्रिकेटची समज आणि निर्भयता याचे एक अप्रतिम मिश्रण

महाईन्यूज । दुबई

**आयपीएल 2026 चा हंगाम सुरू झाला आणि क्रिकेट जगतात एकाच नावाचे वादळ घोंगावू लागले... ते नाव म्हणजे वैभव सूर्यवंशी! अवघ्या १५ वर्षांच्या या 'वंडर बॉय'ने मैदानात उतरताच आपल्या बॅटने जगभरातील दिग्गज आणि अनुभवी गोलंदाजांची अक्षरशः पळता भुई थोडी झाली. वैभवच्या या अद्भूत आणि वादळी कामगिरीची दखल घेत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) त्याला थेट 'टीम इंडिया'चे तिकिट दिले.**




आता वैभव एका ऐतिहासिक उंबरठ्यावर उभा असून, भारताचा सर्वात तरुण आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू बनण्याचा मान मिळवण्याच्या तो अगदी जवळ आहे. दरम्यान, त्याच्या या ऐतिहासिक महा-पदार्पणापूर्वी भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक आणि राजस्थान रॉयल्सचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी वैभवला एक अत्यंत मोलाचा सल्ला दिला आहे.

शुक्रवारी बेलफास्ट येथे आयर्लंडविरुद्ध होणाऱ्या पहिल्या टी-२० सामन्यात भारत सूर्यवंशीला पदार्पणाची संधी देईल अशी दाट शक्यता आहे. वै तो या सामन्यात खेळला, तर त्याचे वय १५ वर्षे आणि ९१ दिवस असेल. म्हणजेच, सचिन तेंडुलकरने १९८९ मध्ये वयाच्या १६ व्या वर्षी आणि २०५ व्या दिवशी पाकिस्तानविरुद्ध केलेल्या आंतरराष्ट्रीय पदार्पणापेक्षाही वैभवचे वय कमी असेल.

या तरुण खेळाडूभोवतीची उत्सुकता वाढत असतानाच, भारताचे माजी प्रशिक्षक आणि राजस्थान रॉयल्सचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी या किशोरवयीन खेळाडूबद्दल आपले विचार मांडले आहेत. 'बीबीसी'शी बोलताना द्रविड यांनी सूर्यवंशीचे वर्णन "एक अत्यंत दुर्मिळ आणि अद्वितीय प्रतिभा" असे केले. या तरुण खेळाडूभोवतीची उत्सुकता वाढत असतानाच, भारताचे माजी प्रशिक्षक आणि राजस्थान रॉयल्सचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी या किशोरवयीन खेळाडूबद्दल आपले विचार मांडले आहेत. 'बीबीसी'शी बोलताना द्रविड यांनी सूर्यवंशीचे वर्णन "एक अत्यंत दुर्मिळ आणि अद्वितीय प्रतिभा" असे केले.

### आयपीएलमधील धमाकेदार कामगिरी

राजस्थान रॉयल्ससोबतच्या आयपीएलच्या एका अप्रतिम हंगामानंतर सूर्यवंशीचे हे पदार्पण होत आहे. या स्पर्धेत १६ डावांत २३७.३० च्या अद्भूत स्ट्राईक रेटने ७७६ धावा करत तो सर्वाधिक धावा करणारा (ऑरेंज कॅप विजेता) फलंदाज ठरला होता.सीनियर भारतीय संघात सामील होण्याच्या अवघ्या काही दिवस आधी, सूर्यवंशी 'इंडिया अ' कडून 'श्रीलंका अ' विरुद्ध खेळत होता. तिथे त्याने लिस्ट-ए (LIST A) क्रिकेटमध्ये अवघ्या ११ चेंडूत अर्धशतक ठोकून सर्वात वेगवान अर्धशतकाचा विक्रम मोडीत काढला.

### केवळ नशीब नाही, तर कठोर परिश्रम

सूर्यवंशीचे यश केवळ नशिबामुळे किंवा नैसर्गिक प्रतिभेमुळे नाही. २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्समध्ये काम करतानाचे दिवस द्रविडने आठवले, जेव्हा या तरुणाने वयाच्या १४ व्या वर्षी आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. त्याने खूप कठोर परिश्रमही केले आहेत, त्यामुळे ही केवळ देणगी नाही. लहानपणापासूनच त्याने हजारो चेंडूंचा सराव केला आहे. मी राजस्थान रॉयल्समध्ये ते स्वतः पाहिले असल्याचेही त्यांनी नमूद केले. वैभव आता आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात करत असताना, प्रगतीचे व्यवस्थापन अत्यंत काळजीपूर्वक करण्याचा सल्ला द्रविड यांनी भर दिला.

# २०३० चा फिफा विश्वचषक खेळणार की नाही? लिओनेल मेस्सीने सोडलं मौन

महाईन्यूज । डॅलस

**फिफा विश्वचषक स्पर्धेचा थरार शिगेला पोहोचला असून, दिग्गज संघांसोबतच स्टार खेळाडूंची चर्चा जगभरात रंगली आहे. यातच सध्या सर्वाधिक चर्चेत आहे तो अर्जेंटिनाचा जादूगार लिओनेल मेस्सी! हा त्याचा कारकिर्दीतील शेवटचा विश्वचषक असेल, अशा चर्चांना उधाण आलं होतं. मात्र, आता थेट २०३० च्या फिफा विश्वचषकात खेळण्याबाबत मेस्सीने स्वतः मौन सोडलं असून, त्याच्या एका वक्तव्याने फुटबॉल जगतात खळबळ उडवून दिली आहे.**



मेस्सीसाठी हा सहावा विश्वचषक आहे. त्याने 2006 मध्ये जर्मनी येथे झालेल्या विश्वचषकातून या स्पर्धेत पदार्पण केले होते. 2022 मध्ये पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला होता. मेस्सीच्या चाहत्यांना तो आणखी अनेक वर्षे खेळताना पाहायचे असले, तरी 2030 मध्ये स्पेनमध्ये होणाऱ्या पुढील विश्वचषकावेळी तो 42 वर्षांचा असेल. त्यामुळे तो तेव्हा खेळणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

२०२६ च्या विश्वचषकातील 'ग्रुप जे' (Group J) मधील दुसऱ्या सामन्यात अर्जेंटिनाने ऑस्ट्रियावर २-० अशी मात केली. या विजयानंतर आयोजित पत्रकार परिषदेत मेस्सीला या स्पर्धेच्या आगामी शताब्दी आवृत्तीत (२०३० च्या विश्वचषकात) खेळण्याबाबत विचारण्यात आले. वृत्तासंस्था एएनआय'ने दिलेल्या वृत्तानुसार, मेस्सी म्हणाला. "खरं सांगायचं तर, मी सध्या तरी त्याबद्दल विचार करत नाहीये.

ती गोष्ट अजून बरीच लांबची वाटतेय, पण मी आधी म्हटल्याप्रमाणे, मी प्रत्येक दिवस जसा येईल तसा जगतोय आणि सध्या फक्त वर्तमानावरच माझं लक्ष केंद्रित आहे. मी अजून काही काळ खेळत राहीन. जोपर्यंत मी संघासाठी योगदान देऊ शकतो, शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त वाटते आणि सहकाऱ्यांना मदत करू शकतो, तोपर्यंत मी खेळत राहणार आहे." गतविजेता अर्जेंटिनाने फिफा विश्वचषक 2026 मध्ये शानदार सुरुवात केली आहे.

### लिओनेल मेस्सी @18

अर्जेंटिनाच्या फिफा विश्वचषक 2026 मोहिमेला अवघे दोन सामने झाले असले तरी लिओनेल मेस्सीची जादू आधीच चाहत्यांवर मोहिनी घालत आहे. अर्जेंटिनाने केलेले सर्व पाच गोल मेस्सीच्या खात्यात जमा झाले आहेत. अल्जेरियाविरुद्ध हॅट्रिक केल्यानंतर 38 वर्षीय मेस्सीने ऑस्ट्रियाविरुद्ध आणखी दोन गोल करत फिफा विश्वचषकातील एकूण 18 गोलांचा टप्पा गाठला. हा विश्वविक्रम ठरला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शुक्रवार ।
दि. 26 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पाणी प्रकल्पांसाठी ५५० कोटींच्या ठेवी वापरणार

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या पाण्याच्या गरजा लक्षात घेऊन महापालिकेने पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प आणि आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी आणण्याच्या योजनेला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी महापालिकेच्या सर्वसाधारण निधीतील ५५० कोटी रुपयांच्या ठेवी वापरण्याची तयारी सुरू असून, त्यासाठी पदाधिकारी व प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत.

गेल्या १५ वर्षांपासून रखडलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पासाठी १ हजार २०० कोटी रुपयांचा सुधारित डीपीआर तयार करण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास शहराला अतिरिक्त १०० एमएलडी स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर आंद्रा धरणातून पाणी आणण्यासाठी जॅकवेल आणि भूमिगत जलवाहिनीचे कामही हाती घेतले जाणार आहे.

दरम्यान, भामा आसखेड धरण योजनेचे उर्वरित काम वेगाने सुरू असून मार्च २०२७ पर्यंत शहराला १६७ एमएलडी अतिरिक्त पाणी मिळण्याची अपेक्षा आहे.

स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले की, पाणीपुरवठा योजनांसाठी ५५० कोटी रुपये वापरले जाणार असले तरी महापालिकेच्या ४,२१८ कोटी रुपयांच्या राखीव ठेवींना कोणताही धक्का बसणार नाही. यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली जाणार आहे.


## कर्जाऐवजी स्वतःच्या निधीतून प्रकल्पाला चालना

यापूर्वी पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पासाठी राष्ट्रीयीकृत बँका आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले होते. मात्र, आता महापालिकेच्या सर्वसाधारण निधीतील रक्कम वापरण्याचा निर्णय पुढे येत असल्याने कर्ज घेण्याची आवश्यकता कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत EV धोरण लागू?

## अर्बन स्ट्रीटवरील तीन ते चार ठिकाणी प्रकार 100 हून अधिक दिवे चोरीला गेल्याच प्रकार उघड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या वाहनव्यवस्थेत पर्यावरणपूरक बदल घडवून आणण्यासाठी एक महत्त्वाचे आणि क्रांतिकारी पाऊल उचलण्यात येत आहे. आगामी काळात महापालिकेच्या महापौर, आयुक्त, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी वर्गाच्या अधिकृत प्रवासासाठी ‘इलेक्ट्रिक वाहन (EV) धोरण’ निश्चित करण्यात येणार आहे. अशी माहिती स्थायी सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.**



शहरातील वाढते प्रदूषण कमी करणे आणि इंधनावरील खर्च मर्यादित ठेवणे या दुहेरी उद्देशातून हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या महापालिकेच्या माध्यमातून विविध पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसाठी वाहनांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. या धोरणांतर्गत आता इंधनवर चालणाऱ्या गाड्यांच्या ताफ्याऐवजी टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश केला जाणार आहे. यासाठी आवश्यकतेनुसार टाटा नेक्सॉन ईव्ही, टाटा हॅरियर ईव्ही आणि महिंद्रा ईव्ही यांसारख्या आधुनिक इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या उपक्रमामुळे महापालिकेची ‘ग्रीन मोबिलिटी’च्या दिशेने वाटचाल सुरू होणार असून, ‘ग्रीन नंबर प्लेट’ असलेली ही वाहने महापालिकेच्या प्रशासकीय कारभारात आधुनिकता आणि पारदर्शकता आणतील. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शहरात आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशन्सची उभारणी आणि अन्य तांत्रिक बाबींचा आढावा प्रशासनाकडून घेतला जात आहे. हा निर्णय केवळ प्रशासकीय बदल नसून, शाश्वत शहर विकासाच्या दृष्टीने टाकलेले एक दूरदृष्टीचे पाऊल आहे, ज्यामुळे प्रदूषणमुक्त शासकीय वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.

“ सध्या अनेक पदाधिकाऱ्यांकडे वैयक्तिक वाहने असली, तरी इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय अधिक किफायतशीर आहे. लोकप्रतिनिधींनी अशी वाहने वापरल्यास समाजात पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश जाईल आणि नागरिकांमध्येही इलेक्ट्रिक वाहनांबाबत जागरूकता व आकर्षण निर्माण होईल. महापौर आणि आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हे धोरण लवकरच पूर्णपणे अंमलात आणले जाईल, ज्यामुळे भविष्यात पिंपरी-चिंचवड महापालिका एक ‘ग्रीन’ मॉडेल म्हणून ओळखली जाईल.”

**- अभिषेक बारणे, सभापती स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

### पर्यावरणाचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी

या निर्णयाबाबत अधिक माहिती देताना स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, “पिंपरी-चिंचवड हे प्रगत आणि स्मार्ट शहर आहे, त्यामुळे प्रशासनानेही काळाची पावले ओळखून पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारणे गरजेचे आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणामुळे महापालिकेचा इंधन खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच, पर्यावरणाचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे.

## भाजपा स्वीकृत नगरसेवक पदांसाठी भाजपची नवी अट; शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे संकेत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राज्यातील भारतीय जनता पार्टीच्या आमदार आणि खासदारांच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया, जनसंपर्क आणि संघटनात्मक कामकाजाबाबत काही लोकप्रतिनिधींची कानउघाडणी केली. त्याची राज्यभरात चर्चा झाली. विशेष म्हणजे, आता पिंपरी-चिंचवड शहर भाजपामध्ये प्रदेशाचा ‘पॅटर्न’ राबवला जाणार आहे.**



आगामी काळात महापालिका सभागृहात नियुक्त होणारे ७ स्वीकृत नगरसेवक आणि ३० प्रभाग समिती सदस्य निवडताना संघटनात्मक कार्य, सोशल मीडियावरील सक्रियता आणि विशेषतः एसआयआर (SIR) मोहिमेतील योगदान महत्त्वाचे निकष ठरणार आहेत, असे स्पष्ट संकेत शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका सभागृहात भारतीय जनता पक्षाकडून एकूण ७ स्वीकृत नगरसेवक आणि ३० प्रभाग समिती सदस्य नियुक्त करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर इच्छुकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे.

दरम्यान, भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या ‘एसआयआर’ मोहिमेला भाजपाने प्राधान्य दिले आहे. मतदार यादीतील मृत, स्थलांतरित, दुबार किंवा अपात्र मतदारांची नावे वगळणे आणि पात्र मतदारांची नव्याने नोंदणी करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. मतदार यादी निर्दोष करून निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि निष्पक्ष करण्यासाठी पक्ष संघटना सक्रिय झाली आहे.

“ “भारतीय जनता पक्षात पदे मागून मिळत नाहीत, तर कामाच्या जोरावर मिळतात. ‘एसआयआर’ मोहिमेत ज्यांनी घराघरात जाऊन मतदारांपर्यंत पोहोचण्याचे काम केले, पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली आणि संघटन मजबूत करण्यासाठी योगदान दिले, त्यांनाच संधी मिळेल. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तिनही विधानसभा क्षेत्रांमध्ये ‘एसआयआर’ चे काम प्रभावीपणे झाले पाहिजे, अशा प्रदेश कार्यालयातून सूचना आहेत. केवळ इच्छुक असल्याने स्वीकृत नगरसेवक किंवा प्रभाग समिती सदस्यपद मिळणार नाही. प्रत्येकाच्या कामाचे मूल्यांकन केले जाईल आणि कामगिरीच्या आधारेच निर्णय होईल. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्व प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत.

**- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड,पुणे.**

### कामाचे मूल्यमापन होणार

सूत्रांच्या माहितीनुसार, इच्छुकांनी ‘एसआयआर’ मोहिमेतील सक्रीय सहभाग, मतदार नोंदणी आणि पडताळणीचे काम, सोशल मीडियावरील पक्षाच्या भूमिका व योजनांचा प्रसार, तसेच संघटनात्मक उपक्रमांमधील सहभाग यांचा सविस्तर अहवाल सादर करावा लागणार आहे. या अहवालाच्या आधारेच संबंधित व्यक्तींच्या कामाचे मूल्यमापन होणार असल्याची चर्चा पक्ष वर्तुळात सुरू आहे. यामुळे स्वीकृत नगरसेवक आणि प्रभाग समिती सदस्यपदासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांसमोर आता केवळ राजकीय इच्छाशक्ती नव्हे, तर संघटनात्मक कामगिरी सिद्ध करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. आगामी नियुक्त्यांमध्ये कोण बाजी मारणार याकडे भाजप कार्यकर्त्यांसह शहराच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# पवना थेट जलवाहिनी प्रकल्पासाठी ‘आशेचा किरण’!

## आमदार लांडगेंची मागणी अन् मुख्यमंत्री फडणवीसांनी बोलावली बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ जुलै २०२६ रोजी संयुक्त बैठक होणार आहे. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यासोबत समन्वय केला असून, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागवण्यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत, अशी माहिती भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत सध्या पिंपरी-चिंचवड शहरासह मावळ तालुक्यात विविध स्तरांवर चर्चा सुरू असून, शेतकरी, ग्रामस्थ, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींमध्येही या विषयावर मतमतांतरे आहेत. मात्र, शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पवना धरणावरील जलवाहिनी प्रकल्प आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची संयुक्त बैठक व्हावी आणि प्रकल्पाला गती द्यावी, यासंदर्भात आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना विनंती केली होती. त्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, पवना थेट जलवाहिनी प्रकल्पासाठी गेल्या अनेक वर्षांपासून विधानसभा अधिवेशनात मागणी लावून धरली आहे. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्याशी चर्चा केली आहे. हा प्रकल्प सर्वांच्या सहभागाने आणि समन्वयाने पूर्ण करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. मुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीसाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मावळचे आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे आदी लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी असे प्रशासकीय अधिकारी निमंत्रित आहेत.

### पवना थेट जलवाहिनी प्रकल्पावरील ‘जैसे थे’ आदेश रद्द

भाजपा महायुती सरकारने वर्षभरापूर्वीच पवना थेट जलवाहिनी प्रकल्पावरील ‘जैसे थे’ आदेश रद्द केला आहे. त्यानंतर हा प्रकल्प मार्गी लागण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही यापूर्वी या विषयावर सकारात्मक भूमिका घेतली असून, बैठकीसंदर्भात अनुकूलता दर्शवली आहे. शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक नियोजित केली आहे. त्यामुळे सुमारे ४० लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत प्रकल्प मार्गी लावण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता आहे.

> “पवना जलवाहिनी प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. यासाठी सातत्याने हा प्रश्न आम्ही विधानसभा सभागृहात आणि मंत्रीमहोदय यांच्या बैठकांमध्ये मांडला आहे. त्याला आता मूर्तरुप येताना दिसत आहे. हा प्रकल्प राबविताना मावळमधील शेतकरी, ग्रामस्थ आणि स्थानिक नागरिकांच्या भावना व हितालाही तितकेच महत्त्व दिले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या बैठकीत सर्व संबंधित पक्षांना विश्वासात घेऊन सकारात्मक, सर्वसमावेशक आणि सर्वमान्य तोडगा काढण्याचा प्रयत्न होईल. कोणावरही अन्याय न होता ४० लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या पाणीप्रश्नाचे शाश्वत समाधान मिळविणे हेच आमचे ध्येय आहे.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# ‘इंटरनॅशनल’ नावाखाली शाळांकडून पालकांची फसवणूक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी शाळा व्यवस्थापनांकडून पालकांची आणि विद्यार्थ्यांची मोठी आर्थिक व मानसिक फसवणूक केली जात आहे. काही शाळांच्या नावापुढे 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' आणि 'इंग्लिश मीडियम' अशा बड्या शब्दांचा वापर करून पालकांची दिशाभूल सुरू असल्याचे दिसून येत आहे.**




मुळात ज्या शाळा राज्य मंडळाशी संलग्नित असतात त्या शाळांच्या नावापुढे असे शब्दप्रयोग केले जात आहेत. काही शाळांची मान्यता मराठी माध्यम असतानादेखील त्या इंग्लिश मीडियम असल्याचे दाखवत आहेत. केवळ चकचकीत इमारती आणि डिजिटल बोर्ड दाखवून या शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देत असल्याचा आभास निर्माण केला जात आहे. यामुळे पालकांना वाटते की त्यांचे मूल कोणत्या तरी जागतिक दर्जाच्या शिक्षणपद्धतीमध्ये शिकत आहे, परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांना नियमित राज्य मंडळाचाच अभ्यासक्रम शिकवला जात आहे. मुळात शाळेचे नाव ठरविताना इंटरनॅशनल, ग्लोबल हे शब्द प्रयोग करताना त्या शाळेच्या अन्य शाखा परदेशात असणे अपेक्षित आहे. तसेच त्या शाळेची मंडळ संलग्नता ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील मंडळाशी संलग्न असणे आवश्यक आहे. तर सीबीएसई हा शब्द प्रयोग करण्यासाठी कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही. कारण, सीबीएसई हे नाव केंद्र शासनाच्या स्थापित परीक्षा मंडळाचे नाव आहे.

> पिंपरी-चिंचवड शहरातदेखील अनेक शाळा व्यवस्थापकाकडून इंटरनॅशनल, ग्लोबल, सीबीएसई असे नावे लावलेली आहेत. ज्या शाळांची मान्यता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे, अशा शाळादेखील नावामध्ये 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' सारखे शब्द वापरत आहेत. काहींनी मराठी माध्यम असताना इंग्रजी मीडियम असे सांगितले जात आहे. त्या आदेशाची परिपत्रक काढून लवकरच त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. शाळांची मान्यता तपासून योग्य कारवाई केली जाईल.
>
> **– संगीता बांगर, शासन अधिकारी, शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड.**

### पालकांची फसवणूक सुरू

इंटरनॅशनल, ग्लोबल, सीबीएसई आणि इंग्लिश मीडियम असा शब्द प्रयोग करून शासन, समाज, पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहरातदेखील शेकडो शाळांकडून असा शब्द प्रयोग करत पालकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक सुरू आहे. त्यामुळे शासन आदेशानुसार असे शब्द प्रयोग काढण्यात यावेत, असे आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय कार्यालयाकडून १५ डिसेंबर २०२५ देण्यात आले आहेत.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station